महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, हिंगोली

कार्यालय ईमेल पत्ता: gmchingoli@gmail.com कार्यालय दुरध्वनी क्रं. ०२४५६-२९९२००

जा.क्र.शावैमवरुहिं/आस्थ-३/तांत्रिक पर्यवेक्षक/थेटमुलाखत/जाहिरात/ 1146 /२०२५ दि.26 12२०२५

## - जाहिरात -(Walk-In-Interview)

विषय:-तांत्रिक पर्यवेक्षक हे पद थेट मुलाखतीद्वारे एकत्रित मानधनावर भरणे बाबत ....

संदर्भ :- १.सहाय्यक संचालक,राज्य रक्त संक्रमण परिषद,मुंबई यांचे पत्र क्रं.रा.र.सं.प./प्रशा/डे-५/फाईल क्रं.२९ /११६ /२०२५ दि.१९.०९.२०२५

२.प्राध्यापक व विभागप्रमूख,शरिरविकृतीशास्त्र विभाग यांचे पत्र क्रं.शावैमहिं/शरिरविकृतीशास्त्र/८०/२०२५ दि.२३.०९.२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हिंगोली या संस्थेतील शरिरविकृतीशास्त्र विभागाअंतर्गत रक्त केंद्र येथे तांत्रिक पर्यवेक्षक या पदाचे अर्ज स्विकृत करुन विहीत कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियमानुसार एकत्रित मानधनावर भरण्याकरीता संस्थेच्या जाहिरात फलकावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर पदासाठी दिनांक २९/१२/२०२५ ते दि.०२.१.२०२६ या कालावधीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,हिंगोली येथे अर्ज भरावे. पात्र झालेल्या उमेदवारांना मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची मुलाखतीची वेळ व तारीख कळविण्यात येईल. तसेच जे उमेदवार अन्य शासकीय/खाजगी संस्थेत/वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत त्यांनी संबंधित संस्थेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकीत प्रती जोडाव्यात.

| .क्रं. | पदाचे नाव | एकून रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | शैक्षणिक अर्हता व अनुभव | एकूण मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Technical Superviser | 1 | Blood Center Govt.Medical College & Hospital Hingoli | 1.Diploma in medical Laboratory Technology or Transfusion medicine or Blood bank Technology after 10+2 with one year experience in the testing of blood or its components in licensed blood center or<br>2.Degree in Medical laboratory technology or Blood Bank Technology with six months experience in the testing of Blood or its components or both in licensed blood center or 3.B.Sc.in Hematology transfusion medicine with six months experience in the testing of Blood or its components or both in licensed blood center or<br>4.M.Sc. in transfusion medicine with six months experience in the testing of blood or its components or both in licensed blood center or<br>5.PGDMLT or PGDMLT Science with six months experience in the testing of blood or its components<br>6.Post Graduate Diploma in Transfusion Technology (PGDTT) approved by the Central Government or State Government with experience of six months in testing of blood or its components or both in licensed blood center<br>7.BPMT Laboratory or BPMT Transfusion Medicine with six months experience in the testing of blood or its components or both in the licenced blood center.<br>8.Any of the above educational qualification with paramedical council Registration/Renewal of Registration is must. | 17000/- (Contractual) |

अटी व शर्ती-

वरिल नमूद पद हे राज्य शासनाचे पद नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाचे पद आहे, सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाही तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे बाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किवा सेवा संरक्षण संबंधी दावा करण्याचे अधिकार राहनार नाही.

१. पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे, तांत्रिक पर्यवेक्षक या पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवाराकडे उपरोक्त नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभवासहीत संबंधीत पॅरॉमेडीकल कॉन्सीलकडे नोंदणी व पुर्ननोंदनी केलेले प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.संबंधीत पॅरॉमेडीकल कॉन्सीलकडे नोंदणी व पुर्ननोंदनी केलेले प्रमाणपत्र नसल्यास संबधीत उमेदवारास अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी

२. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

३. अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षा पेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादा (खुल्या प्रवर्गासाठी ३८ व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे) या पेक्षा जास्त नसावे.

४. जाहिरात मधील रिक्त पद भरती स्थगिती करणे/रद्द करणे व पद भरती प्रक्रिया या बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता/अध्यक्ष निवड समिती शा.वै.म.व रुग्णालय,हिंगोली यांनी राखून ठेवले आहेत. या बाबत कोणालाही कसल्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

५. सविस्तर जाहिरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,हिंगोली च्या नोटीस बोर्डवर व संकेतस्थळावर gmchingoli.in प्रसिध्द करण्यात येईल या बाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र व्यवहार केला जाणार नाही.

६. पात्र व अपात्र उमेदराची यादी, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरतीबाबतची सर्व माहिती/सुचना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,हिंगोली च्या नोटीस बोर्ड येथे वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल या बाबत अर्जदारास स्वतंत्र व्यवहार केला जाणार नाही.

७. पात्र झालेल्या उमेदवारांना निवड यादीतील गुणानूक्रमांच्या आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल या बाबत उमेदवारांनी कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

८. रुग्ण सेवेशी संबंधीत पदासाठी सेवा समाप्ती वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. वय वर्ष ६० नंतर प्रत्येक वर्षी वैद्यकीय मंडळ यांच्याकडून शारिरीकदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाले नंतरच नियुक्ती/पुर्ननियुक्ती आदेश देण्यात येतील.

९. राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या मार्गदर्शक सुचनानूसार जाहिरातीतील नमूद केलेल्या पदासाठी गठित करण्यात आलेल्या निवड समिती बाबत मुलाखती व्दारे निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

१०. जाहिरातीतील दर्शविण्यात आलेल्या पदासाठी निवडप्रकिया पुर्ण करुन प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व सदर यादी पूढील वर्ष भरात राज्य रक्त संक्रमण परिषद वेळोवेळी रिक्त होणा-या पदांच्या भरतीकरिता वापरण्यात येईल.

११. मुलाखती मध्ये समान गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांबाबतीत प्राध्यान्यक्रम ठरवित असताना खालील बाबीचा विचार करण्यात येईल.अ-उच्च शैक्षणिक अर्हतेस प्राध्यान्य ब-अनुभव कालावधी अधिक असणा-या उमेदवारास प्राध्यान्य क-अधिक वयोमान असणा-या उमेदवारास प्राधान्य.

१२. तांत्रिक पर्यवेक्षक या पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी संबंधीत कॉन्सील कडे नोंदणी व पुर्ननोंदनी केलेली प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. संबंधीत कॉन्सील कडे नोदनी व पूर्ननोंदनी केलेली प्रमाणपत्रे नसल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१३. निवड झाल्यानंतर निवड उमेदवारास प्रथमत: ११ महिन्याचे नियुक्ती आदेश देण्यात येईल व तदनंतर उमेदवाराचे कामाचे मुल्यांकन होऊन समाधानकारक अहवाल असल्यास त्यास पुर्ननियुक्ती आदेश देण्यात येतील. त्या करीता उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहनार नाही.

१४. उपरोक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता (अनुभव व अर्हता) आवश्यकतेनूसार शिथील करण्यात येईल.

१५. सदर पदभरती या बाबतची न्यायप्रक्रिया ही जिल्हा सत्र न्यायालय हिंगोली यांच्या न्यायकक्षेत मर्यादित असेल.

१६. अर्जा सोबत प्रत्येक उमेदवारांनी लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र जाहिराती सोबत जोडण्यात आलेल्या विहीत नमूण्यात जोडणे अनिवार्य आहे अन्यथा सदर उमेदवाराचा अर्ज बाद करण्यात येईल.

१७. उमेदवारांनी अर्ज करताना जाहिरातीतील अनु.क्रं.१ या पदाचे नाव यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा तसेच जाहिराती सोबत जोडलेल्या नमूण्यातच परिपूर्ण भरलेला अर्ज स्विकारले जातील. अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१८. अर्जदारांनी विहीत नमूण्यातील अर्ज भरावयाचा असून त्यामध्ये खालील बाबी अतर्भूत करावेत.अर्ज केलेल्या पदाचे नाव,ठळक अक्षरात स्वत:चे नाव,पासपोर्ट साईज फोटो,जन्म तारीख,जातीचा प्रवर्ग,अर्जदाराचा संपूर्ण पत्ता(पिनकोडसहीत) व दुरध्वनी क्रमांक,ई-मेल आयडी,कामाचा अनुभव-काम केलेली संस्था,धारण केलेले पद,कालावधी,पदाची जबाबदारी,शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशिल-अभ्यासक्रमाचे नाव,संस्था/विद्यापिठाचे नाव,उत्तीर्ण झाल्याचे वर्ष,गुणाची टक्केवारी ईत्यादीसह परिपूर्ण भरलेले अर्ज सादर करावे.अपूर्ण अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी कटाक्षाने नोंद घ्यावी. जाहिरातीसोबत विहीत नमूणा जोडलेला आहे.आवश्यक कागदपत्रे जन्म तारखेचा दाखला, शैक्षणिक अहर्ता संबंधी आवश्यक कागदपत्रे, जात प्रमाणपत्रे / जात वैधता प्रमाणपत्र , अनुभव प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे दोन फोटो इत्यादी छायांकीत प्रती साक्षांकित करुन सोबत जोडणे अनिवार्य राहील. महत्वाची सुचना-सदर जाहिरात या संकेतस्थळावर दि.२५.१२.२०२५ पासून उपलब्ध राहील. तसेच पदभरती बाबतची संपूर्ण माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध राहील. या बाबत उमेदवाराशी कोणत्याही प्रकारचा स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी सदर संकेत स्थळास भेट देवून अद्ययावत माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

(डॉ.राजहर्ष हनमंते)
**प्राध्यापक व विभागप्रमुख,**
**शरिरविकृतीशास्त्र विभाग**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,**
हिंगोली

(डॉ.श्रीचक्रधर मुंगल)
**अधिष्ठाता**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,**
**हिंगोली**

प्रति,

१. वैद्यकीय अधिक्षक, शा.वै.म. व रु., हिंगोली
२. लघुलेखक कक्ष, यांनी सदर जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करावी.
३. सुचना फलक, अधिष्ठाता कार्यालय, शा.वै.म.व रुग्णालय, हिंगोली

**प्रतिलीपी :-**

१. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, गो.ते.रुग्णालय संकुल, ९वा मजला, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.आयुक्त (वै.शि.), संचालनालय, वै.शि. व सं., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.